## जाहिरात

# इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी - टी.बी.
# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी-टी.बी. ठाणे महानगरपालिका, ठाणे करीता एक वर्षाच्या करारावर खाली नमुद केल्याप्रमाणे नेमणुकीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. सदर नेमणुका सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम प्रकल्प सुरु असेपर्यंत

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अहर्ता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | Specialist consultant (TB consultant) | १ | १) MBBS degree from recognized institution<br>MD chest and TB /<br>DNB chest and TB /<br>MD medicine /<br>Diploma TB and chest disease | ४५ वर्षापर्यंत (निवृत्त सरकारी कर्मचारी यांना ६२ वर्षापर्यंत) | प्रति भेट रू..१००० प्रमाणे |
| २ | टी.बी.एच.व्ही (क्षयरोग आरोग्य प्रचारक) | ३ (२ खुला १ ई.मा.व ) | **Essential:-** १) Graduate OR<br>२) Intermediate (१०+२) and experience of working as MPW/LHV/ANM/ Health worker/ Certificate or higher course in Health education/ Counseling OR<br>३) Tuberculosis health visitor's recognized course.<br>४) Certificate course in computer operations ( minimum two months)<br>**Preferential:-** Training course for MPW or recognized sanitary inspector's course. | ३८ वर्षापर्यंत | ११५००/- प्रति महिना<br>(१००००+१५०० प्रवास भत्ता) |

अस्तित्वात राहतील.

अटी व शर्ती :-

१. वरील प्रस्तावीत केलेली पदे ही एकत्रित वेतनावर भरण्यात येतील.
२. उमेदवाराने अर्ज A४ साईज पेपरवर लिहून त्यामध्ये खालील बार्बीचा उल्लेख करावा.
   **अ. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जामध्ये स्पष्टपणे उल्लेख करावा.**
   **ब. अर्जदाराचे संपूर्ण नाव, पत्रव्यावहाराचा पत्ता, दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक.**
   **क. जन्मतारीख (सोबत जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र जोडावे ).**
   **ड. जात प्रमाणपत्र.**
   **इ.शैक्षणिक अहर्ता.**
   **ई. अनुभव.**
   **उ. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.**
   **ऊ.उमेदवाराने त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा अथवा गंभीर न्यायालयीन प्रकरण नाही याचे अभिमत (Undertaking) द्यावे.**
३. अर्जासोबत वरील सर्व प्रमाणपत्राच्या स्वंय साक्षांकित प्रती जोडण्यात याव्यात.
४. नेमणुकी संदर्भात सोसायटीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.
५. शासकीय सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सेवेत असलेल्या उमेदवारांनी संबंधीत कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६. सदर पदाकरिता राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारास पुढील ११ महिन्याकरिता नियुक्ती देण्यात येईल.
७. अर्जदाराने परिपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक ती माहिती भरुन साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रासह सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम कार्यालय, ४था माळा, आरोग्य विभाग, महापालिका भवन, अल्मेडा रोड,चंदनवाडी, पांचपखाडी, ठाणे (प) -४०० ६०२. दूरध्वनी क्र.२५३३ १२११ /२५३३ १५९०. विस्तार क्र.४१४. या पत्यावर दि.०८/०२/२०१९ रोजी साय ५:४५ वाजेपर्यंत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळतील अशा बेताने पोस्टाने / कुरियरने अथवा प्रत्यक्षात जमा करावीत. सदर तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
८. आलेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन शैक्षणिक पात्रता व नियमाप्रमाणे पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. मुलाखतीचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

| शैक्षणिक अहर्ता | अनुभव | विषय ज्ञान | सामान्य ज्ञान | कौशल्य चाचणी | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक अहर्ता एकूण २० गुण<br>१) मूळ शैक्षणिक अहर्ता १० गुण<br>२) अतिरिक्त शैक्षणिक अहर्ता १० गुण | प्रत्येक वर्षासाठी १ गुण व ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त अनुभव असल्यास ५ गुण. शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य | १५ गुण | ५ गुण | ५ गुण | ५० गुण |

९. एकास पाच याप्रमाणापेक्षा जास्त अर्ज एखाद्या पदासाठी उपलब्ध झाल्यास पदानुसार शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीकरिता गुणांचा कट ऑफ लावून एकास पाच याप्रमाणात पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.
१०. सदरची जाहिरात www.thanecity .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.
११. सदरची पदे भरती करण्यापूर्वी मंजुर कार्यरत पदापैकी काही पदे रिक्त झाल्यास सदरची रिक्त पदे (वरिल संवर्गातील) भरण्यात येतील. त्यामुळे पदांच्या संख्येत वाढ हाऊ शकते.

**मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी सोबत आणावीत.**

सही /-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी / सदस्य सचिव
इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी-टी.बी.
ठाणे महानगरपालिका, ठाणे